
अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, उस्मानाबाद, लातूर, विजापूर, गुलबर्गा, बिदर, बीड





www.surajyadigital.com | बुधवार, दि.१८ जानेवारी २०२३ | वर्ष : २१ वे | अंक : ११३ वा किंमत : ५ रुपये | पाने ८



# शिवसेना कोणाची ?

## ठाकरे विरुध्द शिंदे


# तारीख पे तारीख



सुराज्य/मुंबई


शिवसेनेत बंड झाले आणि शिवसेनेचे दोन तुकडे झाले. एक गट उध्दव ठाकरेंसोबत राहिला तर दुसरा एकनाथ शिंदे यांच्यासोबत गेला. या बंडामुळे उध्दव ठाकरेंचे मुख्यमंत्रिपद गेले तर एकनाथ शिंदे यांना मुख्यमंत्रिपद मिळाले. यानंतर प्रश्न निर्माण झाला तो म्हणजे शिवसेना कोणाची? याचे उत्तर मिळवण्यासाठी दोन्ही गट कोर्टात पोहचले. कोर्टाने त्यांना निवडणूक आयोगाकडे धाडले. आता निवडणूक आयोगात सुनावणी सुरू आहे. मंगळवारी निर्णय होईल असे वाटत असतानाच आयोगाने पुन्हा तारीच दिली आहे. त्यामुळे शिवसेना कोणाची? या प्रश्नावर उत्तर नव्हे तर तारीख पे तारीख मिळत आहे.

### ठाकरे गटाचे वकील कपिल सिब्बल यांचा युक्तिवाद



* शिवसेनेतील फूट म्हणजे निव्वळ कल्पना आहे. शिवसेनेतील फूट ग्राह्य धरू नये.
* उध्दव ठाकरेंच्या नेतृत्वाखाली असलेली शिवसेना हीच खरी शिवसेना आहे.
* शिंदे गटाच्या कागदपत्रांमध्ये त्रुटी असून कागदपत्रे तपासण्याची गरज आहे.
* काही लोकांना घेऊन पक्षातून बाहेर पडणे हे बेकायदेशीर आहे.
* निवडणूक आयोगाने सर्व बाजू तपासाव्यात. सर्व कागदपत्रांची छाननी करावी.
* सुप्रीम कोर्टाचा निर्णय लागल्याशिवाय निवडणूक आयोगाने निर्णय देऊ नये.

### शिंदे गटाचे वकील महेश जेठमलानी यांचा युक्तिवाद



* कागदपत्रामध्ये कोणत्याही त्रुटी नाहीत.
* आमच्याकडे संख्याबळ जास्त आहे.
* आमदार, खासदारांचे बहुमत जास्त असल्याने पक्षचिन्हाचा निर्णय लवकर घ्यावा.
* सुप्रीम कोर्टात कुणाचेही निलंबन झालेले नसल्यामुळे निर्णय तात्काळ द्यावा.

शिवसेना कोणाची? शिवसेनेचे निवडणूक चिन्ह धनुष्य-बाण कोणाचे? हे निश्चित करण्यासाठी बुधवारी केंद्रीय निवडणूक आयोगासमोर सुनावणी झाली. दोन्ही गटाच्या वकिलांनी आपापली बाजू भक्कमपणे मांडली.

निकाल लागेल असे संपूर्ण महाराष्ट्राला वाटत होते. पण आयोगाने दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेतले आणि पुढची तारीख दिली. त्यामुळे पुन्हा महाराष्ट्राचे लक्ष २० जानेवारी रोजी होणाऱ्या सुनावणीकडे लागले आहे.

### लाखो प्रतिज्ञापत्रे सादर




निकाल आपल्या बाजूने लागावा, यासाठी दोन्ही गटाकडून निवडणूक आयोगाला चढाओढीने प्रतिज्ञापत्रे सादर करण्यात आली आहेत. ठाकरे गटाकडून २२ लाख २४ हजार ९५० तर शिंदे गटाकडून ४ लाख ५१ हजार १२७ इतके प्रतिज्ञापत्र दाखल करण्यात आली आहेत.

### शिंदेंचा दावा असणारे पद बेकायदेशीर

शिंदे गटाकडून ज्या पदावर दावा सांगितला जात आहे, ते 'मुख्य नेता' पद बेकायदेशीर आहे. पक्षाच्या संविधानात असे कोणतेही पद नाही. संविधानात 'मुख्य नेता' पद नसेल तर एकनाथ शिंदे स्वतः:ला 'मुख्य नेता' कसे काय म्हणू शकतात? यावरच आज युक्तिवाद झाला. आम्ही निवडणूक आयोगाकडे एक पत्र सादर केले. ज्यामध्ये एकनाथ शिंदे यांनी 'पक्षाच्या संविधानावर श्रद्धा आणि निष्ठा ठेवेन' अशी शपथ घेतली होती. आज त्याच संविधानाला शिंदे गट बेकायदेशीर म्हणत आहेत. हा खूप मोठा विरोधाभास आहे. एकनाथ शिंदे स्वतः:ला 'मुख्य नेता' म्हणत आहेत, पक्षप्रमुख म्हणत नाहीत,

- ॲड. सनी जैन (ठाकरे गटाचे वकील)

---

## स्नेहसंमेलनात शिक्षकाने केला विनयभंग

सांगोला : कोळा येथील शाळेमध्ये स्नेहसंमेलन कार्यक्रमाप्रसंगी शाळेतील शिक्षक एस. एस. भागरे यांनी शाळेतील अल्पवयीन मुलीचा विनयभंग केल्याची घटना २८ डिसेंबर रोजी घडली.

शाळेमध्ये सायंकाळी चार ते सहाच्या दरम्यान स्नेहसंमेलन कार्यक्रम आयोजित केलेला होता. शिक्षक भागरे यांनी स्नेहसंमेलनातील गर्दीचा फायदा घेऊन त्यांच्या शाळेतील अल्पवयीन मुलीचा विनयभंग केला. सोमवार १६ जानेवारी रोजी घटनेची माहिती मुलीने आपल्या आई-वडिलांना दिली. संतप्त पालकांनी सांगोला पोलीस स्टेशनमध्ये फिर्याद दिली. पोलिसांनी त्वरित कारवाई करून भागरे शिक्षकाविरूध्द पोक्सो अंतर्गत गुन्हा दाखल करून अटक केली. सांगोला येथील दिवाणी फौजदारी न्यायालयासमोर आरोपीस उभे केले असता २० जानेवारीपर्यंत पोलीस कोठडी दिली. पुढील तपास एपीआय हुले करीत आहे.

## फोटो व्हायरल करण्याची धमकी देऊन मुलीवर अत्याचार

### तरुणाला सात दिवसांची कोठडी

सोलापूर : माढा तालुका परिसरात नातेवाईकाच्या घरात असताना अल्पवयीन तरुणीचे काढलेले फोटो व्हायरल करण्याची धमकी देऊन तिच्यावर अत्याचार केल्याप्रकरणी सुजीत शिवाजी गाडे (वय २४ रा.सातोली ता.करमाळा) याला टेंभुर्णीच्या पोलिसांनी अटक केली. त्याला ७ दिवस पोलीस कोठडीत ठेवण्याचा आदेश बार्शीच्या न्यायालयाने मंगळवारी दिला.

ती अल्पवयीन तरुणी नातेवाईकाच्या घरात असताना सुजीत गाडे या तरुणाने तिचे फोटो काढले होते. त्यानंतर फोटो मोबाईलवर वायरल करण्याची धमकी त्याला दिली होती. ती तरुणी लातूर येथे असताना तिला भेटून त्याने ठार मारण्याची धमकी दिली. आणि तुळजापूर येथील लॉजवर नेऊन तिच्यावर अत्याचार केला. हा प्रकार त्याने ऑक्टोबर २०२२ ते जानेवारी या दरम्यान केला. अशा आशयाची फिर्याद पीडित तरुणीने पोलिसात दाखल केली. त्याप्रमाणे पोलिसांनी सुजीत गाडे याच्याविरुध्द पोक्सो आणि अत्याचाराचा गुन्हा दाखल करून अटक केली. त्याला २३ जानेवारीपर्यंत पोलीस कोठडीत ठेवण्याचा आदेश न्यायालयाने दिला. पुढील तपास सहाय्यक निरीक्षक जोग करीत आहेत.


## दोन गटात दगड आणि काठीने मारहाण

सोलापूर : वाहन बाजूला घेण्याच्या कारणावरून दगड काठी आणि लाथाबुक्याने झालेल्या मारहाणीत महिलेसह तिघेजण जखमी झाले. ही घटना विजापूर रोडवरील आंबेडकर नगरात घडली.

रोहित दीपक शिरसट (वय २७ रा. आंबेडकर नगर) असे जखमीचे नाव आहे. त्याला वाहन बाजूला घेण्याच्या कारणावरून शिवराज कट्टीमनी, हुसेन कट्टीमनी आणि भिमाबाई कट्टीमनी या तिघांनी मिळून दगड आणि लाथाबुक्याने मारहाण केली. तर दुसऱ्या गटातील हुसेन शांतप्पा कट्टीमनी (वय ४३) आणि भिमाबाई शांतता कट्टीमनी (वय ७२ दोघे रा. आंबेडकर नगर)हे दोघे जखमी झाले. त्याना रोहित शिरसट याने दगड आणि काठीने मारहाण केली. सर्व जखमींना उपचारासाठी शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले. या घटनेची नोंद विजापूर नाका पोलिसात झाली आहे.

### सीसीएच प्रकरणी आरोपींच्या कोठडीत वाढ

## अनेटा, ॲप मालक यांचे आरोपींमध्ये नाव वाढवले



सोलापूर : सीसीएच ॲपच्या माध्यमातून गुंतवणूक करण्यास सांगून अनेकांची फसवणूक केल्याप्रकरणी अटक करण्यात आलेल्या अनंत येरंकल्लू व जयंत येरंकल्लू यांच्या पोलीस कोठडीत १९ जानेवारीपर्यंत वाढ करण्याचा आदेश विशेष न्यायालयाने दिला. या गुन्ह्यात अनेटा व सीसीएच ॲपचा मालक या दोघा आरोपींची नावे वाढविण्यात आली आहेत.

१२ ऑक्टोबर रोजी अनंत येरंकल्लू, जयंत येरंकल्लू, स्मिता येरेकल्लू यांच्यावर फौजदार चावडी पोलिसात गुन्हा दाखल झाला होता. तेव्हापासून पोलीस तिन्ही आरोपींच्या शोधात होते. दरम्यान, यातील अनंत व जयंत येरंकल्लू यांना शहर आर्थिक गुन्हे शाखेच्या पोलिसांनी दोन महिन्यांनी गेल्या मंगळवारी अटक केली. त्यांना १७ जानेवारीपर्यंत न्यायालयाने पोलीस कोठडी दिली होती. ही मुदत संपल्यानंतर पुन्हा त्यांना न्यायालयात हजर केले असता त्यांची १९ जानेवारीपर्यंत पोलीस कोठडी वाढविण्यात आली आहे.

न्यायालयात युक्तिवादा दरम्यान पोलिसांनी गुन्ह्याचा आवाका मोठा आहे, आर्थिक गुन्हा आहे, आरोपी हे ॲप कसे चालवत होते, याची माहिती आरोपींकडून मिळाली आहे, सोबतच आरोपींकडून पैसे मोजण्याचे मशीन जप्त केले आहे. घोटाळ्यामधून मिळवलेल्या पैशामधून आरोपींनी स्थावर मालमत्ता घेतली आहे का याची सुद्धा चौकशी करावयाची आहे, त्यामुळे आरोपींना पुन्हा ७ दिवसांची पोलीस कोठडीची मागणी केली. तर आरोपींच्या वकिलांनी युक्तिवाद करताना हा गुन्हा पूर्णतः तांत्रिक आहे.

आरोपी हे व्यावसायिक असल्याने पैसे मोजण्याचे मशीन बाळगणे ही मोठी गोष्ट नाही. उलट फिर्यादीच्या बँक खात्याची सुद्धा चौकशी करावी. आरोपींच्या खात्यामध्ये यातील कुठल्याही तक्रारदारांनी पैसे गुंतवले नाहीत. त्यामुळे आरोपींच्या पोलीस कोठडीची आवश्यकता नाही. त्यानंतर विशेष न्यायाधीश व्ही. एच. पाटवदकर यांनी आरोपीस दोन दिवसांची १९ जानेवारीपर्यंत पोलीस कोठडी दिली. यात सरकारतर्फे ॲड. दत्तूसिंग पवार व आरोपीतर्फे ॲड. मंजुनाथ कक्कलमेली यांनी काम पाहिले.

## मिळकतकर थकबाकीपोटी आणखी २ कारखाने केले सील

### सील कारवाई टाळण्यासाठी १२ थकबाकीदारांनी भरला ११.६५ लाख रुपये कर



सोलापूर : महापालिकेच्या मालमत्ता कर विभागाच्या वतीने थकित मिळकत कराच्या वसुली व कारवाई धडक मोहीम तीव्र केली आहे. दरम्यान, मंगळवारी दिवसभरात आणखी २ कारखाने पथकाने सील केले. सोलापूर शहर आणि हद्दवाढ भागातील थकबाकी घरगुती मिळकतदारांबरोबरच व्यावसायिक मिळकतदारांवरदेखील सील कारवाई संदर्भातील नोटिसा बजावण्यात आल्या आहेत. नोटीस मिळाल्यानंतर मुदतीत संपूर्ण थकित कर न भरल्यास त्यांच्या मिळकती सील करण्यात येत आहेत.

महापालिका आयुक्त शीतल तेली-उगले यांच्या आदेशानुसार उपायुक्त विद्या पोळ यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई करण्यात येत आहे.

### २ कारखाने केले सील

विशेष पथकाने मंगळवारी विविध भागात कारवाई मोहीम राबविली. नोटीस मिळाल्यानंतर देखील थकीत २ लाख ३१ हजार ७८१ रुपयांचा मिळकत कर जमा न केलेल्या महाराजा फंक्शन हॉल आणि कारखाना तसेच ९३ हजार रुपयाची थकबाकी असलेल्या वसंत उर्फ नागनाथ जवाहर मोहनदास कावळदेवी यांचा कारखाना सील करण्यात आला आहे. या कारवाईमुळे आता कारखाने सील होण्याची संख्या तीन झाली आहे.

### १२ मिळकतदारांनी भरले ११ लाख ६४ हजार

जप्ती व कर वसुली मोहिमेदरम्यान कारवाई टाळून थकीत मिळकतदार ज्ञानेश्वर चारहजारी, सोमनाथ चारहजारी, नरसिंग रंगरेज गोपाल बंकापुरे, नारायण पवार, शंकरसा भूमकर, भारतीय नागरी सहकारी पतसंस्था, सचिन अंजीखाने, सहस्त्रार्जून शाळा, फजल अब्दुल अजीज, रामस्वामी बुटला आणि धोंडीराज माने अशा १२ मिळकतदारांनी पथकाकडे ११ लाख ६४ हजार ९८६ रुपयांचा कर जमा केला. बुधवारी व्यावसायिक मिळकतदारांकडे वसुली मोहीम राबविण्यात येणार असून कर जमा न केल्यास त्या मिळकतदारांवर कारवाई करून त्यांच्या मिळकती सील आणि जप्त करण्याची कारवाई करण्यात येणार आहे. कटू कारवाई टाळण्यासाठी कर भरावा असे आवाहन महापालिका मालमत्ता कर विभागाचे अधीक्षक युवराज गाडेकर यांनी केले आहे.

---

### तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



फुल फॅमिली गड्ड्यावर?

| कल्याण |
|---|
| -------- |

| मेन बाजार |
|---|
| -------- |

## करकंबच्या परवाना रद्द केलेल्या कृषी केंद्रातून ३ लाखांच्या औषधांची चोरी

### ओंकार कृषी केंद्र चालकासह मुलावर गुन्हा दाखल



सोलापूर : करकंब येथील ओंकार कृषी केंद्र यांचा औषध विक्री परवाना रद्द केल्यानंतर दुकानाला ठोकलेले सील तोडून दुकानातील ३ लाख ३१ हजार ४७३ रुपयांची औषधे चोरून नेल्याप्रकरणी दुकानाचा मालक आणि त्याच्या मुलावर करकंब पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दुकान मालक संजय राजाराम पवार व मुलगा ओंकार संजय पवार (दोघेही रा. शुक्रवार पेठ करकंब) अशी गुन्हा दाखल झालेल्या दोघांची नावे आहेत. करण्यात आलेला असताना व सदर कृषी केंद्र तालुका कृषी अधिकारी यांनी सीलबंद केले असताना विनापरवाना बेकायदेशीर सील तोडून त्यामधील माल चोरून नेला असल्याने दुकान मालक संजय राजाराम पवार व मुलगा ओंकार संजय पवार दोघे (रा. शुक्रवार पेठ करकंब) यांच्या विरोधात करकंब पोलिसात ४८ तासानंतर चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्हा हा पंढरपूर तालुका कृषी अधिकारी भागवत सरडे यांनी दाखल केला आहे. याबाबत मिळालेली माहिती अशी की, दि. ०१ नोव्हेंबर २०२२ रोजी पंढरपूरच्या तालुका कृषी कार्यालयात करकंब व बार्डी गावातील ८ शेतकऱ्यांनी करकंबच्या ओंकार कृषी केंद्राविरुद्ध तक्रार केली होती. त्यांनी ओंकार कृषी केंद्रातून खरेदी केलेल्या ग्लायस्टॉप तणनाशकाची ऑक्टोबर छाटणीपूर्वी द्राक्ष बागेत फवारणी केली होती. त्यानंतर त्यांची द्राक्ष बाग फुटली नाही. त्यामुळे त्यांच्या द्राक्ष बागेचे प्रचंड मोठे नुकसान झाल्याची त्यांची तक्रार होती. तालुका कृषी अधिकाऱ्यांनी या तक्रारींच्या अनुषंगाने दि.५ नोव्हेंबर २०२२ रोजी ओंकार कृषी केंद्राचे दुकान आणि गोदामाची ग्लायस्टॉप तणनाशकाचे नमुने तपासणीसाठी घेतले होते. पंचनामा करून दुकान आणि गोदामाला सील ठोकले होते. शिवाय ओंकार कृषी केंद्राकडे औषध विक्रीचा परवाना नसल्या कारणाने या दुकानावर करकंब पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता.

दरम्यान, दुकानाला ठोकलेले सील तोडून दुकान मालकाने दुकानातील व गोदामातील माल लंपास केल्याबाबत दि. १४ जानेवारी रोजी अमर सदाशिव व्यवहारे, बबन प्रभाकर दुधाळ व रियाज बाळू कोरबू (सर्व रा. करकंब) यांनी तालुका कृषी अधिकारी सरडे यांना दूरध्वनीवरून कळवले. कृषी कार्यालयाने प्रत्यक्ष पाहणी केली असता सील तोडलेले आणि दुकान व गोदामातील माल लंपास केल्याचे निदर्शनास आले. दुकान व गोदामातील एकूण १९ कंपन्यांचे ३ लाख ३१ हजार ३७३ रुपयांची औषधे चोरल्याप्रकरणी तालुका कृषी अधिकारी सरडे यांनी करकंब पोलिसात फिर्याद दिली असून दुकान मालक संजय राजाराम पवार व मुलगा ओंकार संजय पवार यांच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.